**संत सेवालाल महाराज बंजारा/लभाणा तांडा समृध्दी योजना लेखाशिर्ष (२५१५ २७५३) अंतर्गत राज्यातील जिल्हापरिषदांना निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पुरक-२०२४/प्र.क्र.१६/आस्था-५**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक: ०५ जानेवारी, २०२६**

संदर्भ :-

१) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.तांसुयो-२०१९/प्र.क्र. ६७/आस्था-५, दि.२३.०२.२०२४
२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः पुरक-२०२४/प्र.क्र.१६/आस्था-५, दि.३१.०३.२०२५
३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः पुरक-२०२४/प्र.क्र.१६/आस्था-५, दि.२२.०९.२०२५
४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः पुरक-२०२४/प्र.क्र.१६/आस्था-५, दि.१७.१०.२०२५
५) ग्रामविकास विभाग,शासन आदेश क्र.तांसुयो-२०२४/प्र.क्र.६५(लातूर)/आस्था-५, दि.०९.१०.२०२५
६) ग्रामविकास विभाग,शासन आदेश क्र.तांसुयो-२०२४/प्र.क्र.७०(रायगड) / आस्था-५, दि.०९.१०.२०२४
७) ग्रामविकास विभाग,शासन आदेश क्र.तांसुयो-२०२४/प्र.क्र.५५ (धाराशिव) / आस्था-५, दि.०९.१०.२०२४
८) ग्रामविकास विभाग,शासन आदेश क्र. तांसुयो -२०२४/प्र.क्र.५४ (जळगाव) / आस्था-५, दि.०९.१०.२०२४
९) ग्रामविकास विभाग,शासन आदेश क्र. तांसुयो -२०२४/प्र.क्र.७३ (नंदुरबार) / आस्था-५, दि.०९.१०.२०२४

**प्रस्तावना:-**

**संत सेवालाल महाराज बंजारा/ लभाणा तांडा समृध्दी योजनेंतर्गत** शासन आदेश दि.०९.१०.२०२४ अन्वये १३४८ तांड्यांना विकास कामे करण्याकरिता एकूण रु.१३९.३५ कोटीच्या कामांना मंजूरी देण्यात आली होती. सन २०२४-२५ या वर्षात मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या अनुषंगाने १६ जिल्हा परिषदांना रु.६९६८.५० लक्ष (७०%) इतका निधी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला आहे. सदर वितरित केलेल्या निधी वापराबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र ५ जिल्हा परिषदांकडून प्राप्त झाले आहेत. सबब, या ५ जिल्हा परिषदांना उर्वरित ३०% निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

"संत सेवालाल महाराज बंजारा/लभाणा तांडा समृध्दी योजना" लेखाशिर्ष (२५१५ २७५३) ३१ सहायक अनुदान सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात बंजारा/लभाणा तांड्यांतर्गत मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी एकूण रु.१००.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी वित्त विभागाकडून ६०% च्या मर्यादेत रु. ६०.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे.

२. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये १६ जिल्हा परिषदांना त्यांनी मागणी केलेल्या रक्कमेच्या ७०% प्रमाणात निधी वितरित करण्यात आला होता. सदर १६ जिल्हा परिषदांपैकी ५ जिल्हा परिषदांना उर्वरित ३०% निधी वितरित करण्याच्या अनुषंगाने एकूण रक्कम **रु. ०५,३१,००,०००/- (रुपये पाच कोटी एकतीस लक्ष फक्त)** संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना खालील प्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

| अक्र | जिल्हा परिषदेचे नाव | मंजूर केलेला निधी (रू. लक्ष) | जिल्हा परिषदेने मागणी केलेली रक्कम (रू.लक्ष) | शासन निर्णय दि.३१.०३.२०२५ अन्वये वितरीत केलेली ७० % रक्कम (रु.लक्ष) | उपयोगिता प्रमाणपत्र (UC) | वितरीत करावयाची उर्वरीत ३०% रक्कम (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लातूर | ४३५.०० | ४३५.०० | ३०४.५० | प्राप्त | १३०.५० |
| २ | रायगड | ११०.०० | १००.०० | ७०.०० | प्राप्त | ३०.०० |
| ३ | धाराशिव | ३५०.०० | १६०.०० | ११२.०० | प्राप्त | ४८.०० |
| ४ | जळगाव | ९१०.०० | ९१०.०० | ६३७.०० | प्राप्त | २७३.०० |
| ५ | नंदूरबार | १६५.०० | १६५.०० | ११५.५० | प्राप्त | ४९.५० |
| | | | | | **एकूण** | **५३१.००** |

३. सदर निधी वितरणासाठी संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना BEAMS प्रणाली व्दारे निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत विहित कार्यपध्दीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत कामे करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी .

४. संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर निधी वितरीत करताना संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

५. ज्या कामाच्या प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे, त्याच कामावर खर्च करण्यात यावा. सदर काम इतर कोणत्याही योजनेतून झालेले नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

६. शासनाने मंजूर केलेल्या निधीचा योग्यरितीने विनियोग होण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी. सदर कामांचा वेळोवेळी आढावा घेऊन कामावर देखरेख ठेवावी व कामांची माहिती उपयोगिता प्रमाणपत्रासह विहित मुदतीत शासनास सादर करावी. तसेच, प्रत्येक जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या निधीच्या २% निधी प्रशासकीय खर्चासाठी राखून ठेवण्याची व खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

७. विकास कामे पूर्ण झाल्यानंतर सदर काम संत सेवालाल महाराज बंजारा/ लभाणा तांडा समृध्दी योजनेतून करण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल अशाप्रकारे लावण्याची दक्षता घ्यावी.

८. राज्य शासनामार्फत वेळोवेळी योजनेविषयी व वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले आदेश/नियम/शासन निर्णय/वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी संबंधित जिल्हा परिषद यांनी करावी. या अटीच्या अधिन राहून सदर निधी वितरीत करण्यात येत आहे.

९. सदर सहायक अनुदानाच्या विनियोजनासंबधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल कार्यालय, मुंबई व या विभागास पाठविण्यात यावे. तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र: अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३,दि.२५ जुलै,२०२४ मधील अटीची व शर्तीचे पालन करण्यात यावे.

१०. सदर खर्च मागणी क्र.एल-०३ "२५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम-००-१०६-ग्रामीण भागात नागरी सुविधा निर्माण करणे- (००) (०४) संत सेवालाल महाराज बंजारा/ लभाणा तांडा समृध्दी योजना (२५१५ २७५३) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

११. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.०१.०४.२०२४, २५.०७.२०२४ व १२.०२.२०२५ चे परिपत्रक आणि वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.५३८/व्यय-१५, दि.२५.०७.२०२५ व नियोजन विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.२६०/२०२५/१४४४, दि.१७.०७.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१०५१११६२०१७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUBHASH BABAN INGALE

Digitally signed by SUBHASH BABAN INGALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ff061387998f39ca303c7da669fe0471ca884215afebe7e53ecc009e02aad1ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F0319D46C62F9F6D7DBC200D9693539DF215A28C05D55971515AC3C87DDAA987, cn=SUBHASH BABAN INGALE
Date: 2026.01.05 13:30:10 +05'30'

**(सुभाष इंगळे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य मलबार हिल, मुंबई.
२) मा. मंत्री (ग्राम विकास व पंचायत राज.) यांचे खाजगी सचिव.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
४) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
५) विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, ( सर्व).
६) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय(लातूर, रायगड, धाराशिव, जळगाव, नंदूरबार).
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (लातूर, रायगड, धाराशिव, जळगाव, नंदूरबार).
८) प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (लातूर, रायगड, धाराशिव, जळगाव, नंदूरबार)
९)मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (लातूर, रायगड, धाराशिव, जळगाव, नंदूरबार)
१०) जिल्हा कोषागार अधिकारी (लातूर, रायगड, धाराशिव, जळगाव, नंदूरबार)
११) नियोजन विभाग, (का-१४४४ ) मंत्रालय, मुंबई-३२.
१२) वित्त विभाग (व्यय १५, अर्थसं १६, अर्थसं १७) मंत्रालय,मुंबई-३२.
१३) कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) निवड नस्ती (का.आस्था-५), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.